

चवदार खेळणं
कमबीझ् काकावांड
भाषांतर : शरद महाबळ
चित्रकार : मोहम्मद महल्लटी
ज्योत्स्ना प्रकाशन

# चवदार खेळणं

मूळ लेखक : कमबीझ् काकावांड
मराठी भाषांतर : शरद महाबळ
चित्रकार : मोहम्मद महल्लटी



ज्योत्स्ना प्रकाशन



Originally published as: Kiseh Box Khoshmazeh
Author: Kmabiz Kakavand    Illustrator: Mohammad Mahallati
© Shabaviz Publishing Company, Tehran, Iran

मराठी आवृत्ती : चवदार खेळणं

प्रकाशक : मिलिंद ल. परांजपे, ज्योत्स्ना प्रकाशन

'धवलगिरी', ४३०-३१ शनिवार पेठ, पुणे ४११०३०

मुंबई ऑफिस : मोहन बिल्डिंग, १६२ ज.शंकरशेठ मार्ग, गिरगाव, मुंबई ४००००४

मराठी भाषांतर © ज्योत्स्ना प्रकाशन, २००७ पहिली आवृत्ती : सप्टेंबर २००७

मुद्रक : रिच प्रिंटस्, २७२ नारायण पेठ, पुणे ४११०३०

**मूल्य रुपये २५/-**    ISBN 81-7925-173-7



Originally published as: Kiseh Box Khoshmazeh
Author: Kmabiz Kakavand    Illustrator: Mohammad Mahallati
© Shabaviz Publishing Company, Tehran, Iran

मराठी आवृत्ती : चवदार खेळणं

प्रकाशक : मिलिंद ल. परांजपे, ज्योत्स्ना प्रकाशन

'धवलगिरी', ४३०-३१ शनिवार पेठ, पुणे ४११०३०

मुंबई ऑफिस : मोहन बिल्डिंग, १६२ ज.शंकरशेठ मार्ग, गिरगाव, मुंबई ४००००४


मराठी भाषांतर © ज्योत्स्ना प्रकाशन, २००७    पहिली आवृत्ती : सप्टेंबर २००७


मुद्रक : रिच प्रिंटस्, २७२ नारायण पेठ, पुणे ४११०३०

मूल्य रुपये २५/-    ISBN 81-7925-173-7



एक होते उंदीरमामा. त्यांना चालताना समोर बघण्याऐवजी वर आकाशात बघायची सवय होती. त्यामुळे काय व्हायचं, ते सारखे धडपडायचे-पडायचे. मग नेहमीचंच, 'आयाऽऽय आणि ओयोऽऽय!' त्यातही जरा जास्त लागलं तर, 'भँऽऽ' करून भोकांड पसरायचे. त्यांच्या हातापायाला सारखंच लागायचं.





असंच एकदा उंदीरमामा निघाले होते. डोळे नेहमीसारखे आभाळाकडे लागलेले!

मग काय? धडकले कशाला तरी!

पण आज ते ज्या वस्तूला धडकले ती एक गंमतच होती. त्या उंदरापेक्षा थोडीशी लहान पण गोल आणि गरगरीत. उंदीरमामा धडपडले आणि पडले ते त्या गोष्टीवरच. त्याला एक लाकडासारखा टणक भाग होता. तो त्यांच्या कपाळाला जोरात लागला. उंदीरमामांना खूप दुखलं आणि ते ओरडले 'ओऽय ओऽऽय! आई गं!'



जरा बरं वाटल्यावर उंदीरमामा उठले आणि जवळ जाऊन त्यांनी पाहिलं, ती गोल वस्तू होती लाल-पिवळ्या रंगाची. त्याला छोटासा एक खळगा होता आणि त्यात एक काडी होती. ही काडीच त्यांच्या कपाळावर आपटली होती.



उंदीरमामांनी मग त्या गमतीभोवती एक चांगली चक्कर मारली. मग त्या गमतीला त्यांनी एक धक्का दिला तर ती अक्रोडासारखी घरंगळायला लागली. पण अक्रोडाच्या टरफलासारखी ती टणक नव्हती, ती गुळगुळीत आणि मऊ होती.

उंदीरमामांनी मग 'हैऽऽयो' म्हणत तो गोल जोरात ढकलला. गोल हालल्यावर त्यांना गंमत वाटली. मग 'चल रे, चल रे,' म्हणत ते ती गंमत पुढे नेऊ लागले. ढकलताना त्यांचा 'हैऽऽयो, हैऽऽयो' असा ओरडा सुरूच होता.

आता ती गंमत जणू स्वतःहून चालू लागली, उंदीरमामा ढकलत नव्हते तरीही.

जरा पुढे गेल्यावर थोडा उतार होता. मग ती गंमत उतारावरून जोरात धावत सुटली.

उंदीरमामा ती मध्येच थांबवू लागले, पण तिची गाडी थांबेच ना!

मग उंदीरमामा त्याच्या पुढे जाऊन थांबले, तर ती गंमत टुणकन त्यांच्यावरून पुढे गेली नि मामा जमिनीवर आडवे पडले.

उंदीरमामा उठले आणि पुन्हा तिच्या मागे धावत सुटले. इतक्यात वेगानं गडगडत चाललेली ती गंमत पुढे असलेल्या एका पाण्याच्या डबक्यात डुबुक्कन पडली.







उंदीरमामाही उतारावरून जोरात पळत सुटले. पुढे जाऊन पटकन पाण्यात उतरले. त्यांनी ती गंमत पुन्हा काठावर आणली.


एवढं धावून उंदीरमामा पार दमून गेले होते. त्यांना वाटलं, जरा झोप काढावी.



पुढ्यात ती वाटोळी, मऊ गंमत होतीच. उंदीरमामांनी त्यावर डोकं टेकवून पाहिलं. म्हणाले, 'काय छान उशी आहे!' पण काही केल्या त्यांना झोप येईना. कारण ही उशी फार उंच होती. त्यांची मान अवघडली. मामा म्हणाले, 'छे! ही कसली उशी!'

मग उंदीरमामा त्या गमतीवरच चढले आणि आडवे झाले. त्यांना वाटले ही गादी असणार!

दमल्यामुळे लगेच त्यांचे डोळे मिटले, त्यांना गाढ झोप लागली. ते असे खूप वेळ झोपून राहिले.








उंदीरमामा उठले तर
त्यांना कसंसंच वाटत होतं.
त्यांना सरळ चालताही येईना.






उंदीरमामांची पाठ तर धनुष्यासारखी झाली होती. काही केलं तरी ती सरळ होत नव्हती. त्यांनी आळोखेपिळोखे घेऊन पाहिले. जमिनीवर लोळलेसुद्धा. शेवटी त्यांनी एकामागून एक कोलांट्या उड्या मारल्या, तेव्हा कुठे ती जरा ठीक झाली.

मग त्या वाटोळ्या गमतीजवळ येऊन ते तिला टेकून उभे राहिले. या वस्तूला काय म्हणावं बरं, त्यांना प्रश्न पडला.


'हां! हा मोठा चेंडू असणार!' असं म्हणत उंदीरमामांनी चार पावलं मागं येऊन त्या चेंडूला जोरात लाथ मारली. पण तो चेंडू जागचा हालला नाही, मामांचा पाय तेवढा दुखला. उंदीरमामा पाय हातात धरून ओरडले, 'ओऽऽय ओऽऽय! ओऽ.'

मग थोड्या वेळानं दुखणं जरा कमी झाल्यावर त्यांनी त्या गमतीवर चढाई केली. वर चढून त्यांनी आपले दोन्ही हात त्या गमतीच्या दोन बाजूंना घट्ट धरले, आणि ते म्हणू लागले, 'हा माझा छान घोडा आहे. चल मेरे घोडे, टिक-टॉक, टिक-टॉक, टिक-टॉक...'





पण तो काही चांगला घोडा नव्हता. कारण ती गंमत जरासुद्धा हालली नाही. तेव्हा उंदीरमामा तिच्यावरून खाली उतरले आणि विचार करत बसले.



बराच वेळ विचार केल्यानंतर त्यांना एक कल्पना सुचली आणि ते त्या लाल-पिवळ्या गमतीसमोर उभे राहिले.

मग त्यांनी दंडाची बेटकुळी काढली, मुठी वळल्या आणि म्हणाले, 'बॉक्सिंगचा सराव करायला पिशवी लागते ना, ती पिशवी असणार ही.' मग उंदीरमामांनी त्यावर दणादण ठोसे मारून बॉक्सिंगचा सराव सुरू केला. मारून मारून त्यांचे हात दुखू लागले, तसे उंदीरमामा म्हणाले, 'हुं! भिकार बॉक्सिंग बॅग आहे ही.'

असं म्हणूनही त्यांनी ठोसे मारणं चालूच ठेवलं. तसा त्यांचा हात खूपच दुखावला. मग उंदीरमामा ओरडले, 'अयाई! ओऽ ही कसली बॉक्सिंग बॅग, हिने माझा हात दुखावला आहे.' उंदीरमामांनी चिडून पुन्हा एक ठोसा मारला तर दुखऱ्या हातांमुळे त्यांच्या डोळ्यांत पाणी आलं.



आता उंदीरमामा चांगलेच चिडले होते. त्यांनी रागारागानं त्या वाटोळ्या गमतीचा चावा घेतला, तसं उंदीरमामा ओरडले, 'ओऽय! अहाहा! आईऽगं! वा, मस्त!'

ज्यामुळे त्यांचे हात दुखत होते त्या गमतीची चव मात्र छान होती.

उंदीरमामांना चांगली भूक लागली होती. त्यांनी आणखी एक चावा घेतला, मग आणखी एक... मग त्या गमतीमध्ये मोठं भोक पडलं. तेव्हा उंदीरमामांना आपल्यासारखा आणखी एक उंदीर दिसला. तो पण दुसऱ्या बाजूनं त्या गमतीचे टवके कुरतडत होता आणि म्हणत होता, 'वाऽ काय छान चवदार आहे हे सफरचंद!'

ते ऐकल्यावर उंदीरमामांच्या डोक्यात प्रकाश पडला. 'अच्छा, असं असतं होय सफरचंद!' असं म्हणत त्यांनी त्या गमतीचा आणखी एक मोठा चावा घेतला.

असं होतं ते चवदार खेळणं!